## -: प्रेसनोट दिनांक - ०१/०६/२०२६ :-

आरोपी लोकसेवक दगडु चंद्राप्पा कुंभार, वय - ५२ वर्षे, पद - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर, रा. वाशी नाका, खामकर गुरुजी कॉलनी २२३/७ कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत...

---

तक्रारदार हे आंतरजिल्हा बदलीवर कोल्हापूर महानगरपालीका अंतर्गत असले शाळेमध्ये बदलीवर आले असुन त्यांचा थकीत पगार व पगाराचा फरक काढुन देण्यासाठी आरोपी लोकसेवक दगडु चंद्राप्पा कुंभार, वय - ५२ वर्षे, पद - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर यांनी तक्रारदार यांच्याकडे ४०,०००/- रुपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांच्याकडे ४०,०००/- रुपये लाचेची मागणी केली, म्हणुन तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे आरोपी लोकसेवक दगडु कुंभार, पद - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर यांनी आतंरजिल्हा बदलीबाबत नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारीपुर्वी दहा हजार रुपये स्विकारल्याचे कबुल करून त्यांनी तक्रारदार यांचा थकीत पगार व पगाराचा फरक काढुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे स्वता:करीता बेकायदेशीरपणे तडजोडीअंती २५,०००/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लगेच घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक दगडु चंद्राप्पा कुंभार, पद - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर यांनी २५,०००/- रुपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी **आरोपी लोकसेवक** आरोपी लोकसेवक दगडु चंद्राप्पा कुंभार, वय - ५२ वर्षे, पद - प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर यांचेविरुध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार, तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राजेंद्र सानप, पो.हे.कॉ.विकास माने, पो.हे. कॉ. सुधिर पाटील, मा.पो.हे.कॉ. संगिता गावडे, पो.कॉ.कृष्णा पाटील, पो.कॉ. रविंद्र पाटील, चा.पो.कॉ.प्रशांत दावणे, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.

Scanned with OKEN Scanner